# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
## कोकण परिमंडळ कार्यालय
## ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

---

**ग्राहक तक्रार क्र. २७/२०१४** **दि. १८.१२.२०१४**

| | |
|---|---|
| **श्री रविंद्र तुकाराम कोळेकर**<br>**उदयनगर, मु.पो. दापोली**<br>**ता. दापोली जिं.रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय खेड** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) श्री. व्ही. बी. जगताप,**<br>**सचिव तथा कार्यकारी अभियंता**<br>**२) श्री. ज. पु. बिवलकर**<br>**सदस्य** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) श्री. रविंद्र तुकाराम कोळेकर**<br>**२) श्री. शशिकांत यशवंत वैद्य( प्रतिनिधी )** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. एस. पी. गायकवाड**<br>**अतिरिक्तकार्यकारी अभियंता,खेड**<br>**२) श्री. प्र.भा. अवसरे**<br>**उपकार्यकारी अभियंता दापोली -२**<br>**३) श्री. मोहन मो.आगाशे**<br>**सहाय्यक अभियंता** |

**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

---

श्री रविंद्र तुकाराम कोळेकर, उदयनगर मु.पो. दापोली, जि. रत्नागिरी यानी यांच्या मालकीच्या जमीनीमध्ये तेथे असलेल्या रोहित्रामुळे स्पार्किग होऊन त्यांच्या बागेचे नुकसान झाल्याबाबतची व त्याच्या अनुषंगाने योग्य ती नुकसान भरपाई मिळण्याबाबतची तक्रार फॅार्म 'अ'मध्ये या मंचाकडे दि.१८.१२.२०१४ रोजी दाखल केलेली आहे. तक्रार दाखल होताच मंचाकडील पत्र क्रं. १८८ दि.२०.१२.२०१४ अन्वये कार्यकारी अभियंता खेड यांचेकडे स्पष्टीकरण मागविणेत आले. तसेच अधिनिमयामधील तरतुदीनुसार दि.२९.०१.२०१५ रोजी सुनावणी निश्चित केलेली होती पण महावितरणच्या अधिकाऱ्यानी केलेल्या विनंतीनुसार ही सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन सुनावणीची प्रक्रिया दि.१०.०२.२०१५ रोजी पुर्ण करण्यात आली.

तक्रारदाराच्या तक्रारीचे स्वरुप असे की त्यांची मौजे खेर्डी येथील सर्व्हे नं.९१ हिस्सा नं.१८ ही जमीन त्यांचे मालकीची आहे. सदर जमीनीमध्ये महावितरणचा रोहीत्र असून त्या रोहित्रामध्ये दि. ३०.०३.२०१४ रोजी स्पार्किंग झाले, व त्यामुळे त्यांच्या जमीनीमध्ये असलेल्या आंबा व काजूच्या झाडाना आग लागून त्यांच्या मालमत्तेचे रु. ५०००००/- (रु. पाच लाख ) इतक्या रक्कमेचे नुकसान झालेले होते. हया बाबीची कल्पना श्री कोळेकर यानी सहाय्यक अभियंता दापोली उपविभाग याना दि. ०४.०४.२०१४ रोजी दिली, तसेच तहसिलदार दापोली यांचेकडून पंचनामा पण करुन घेतलेला आहे. पण महावितरणकडून कोणतीही नुकसान भरपाई न मिळालेमुळे त्यानी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष रत्नागिरी यांचेकडे दि.२६.०८.२०१४ रोजी रितसर तक्रार दाखल केली, त्यानुसार कक्षाने दि.१७.१०.२०१४ रोजी या प्रकरणाचा निर्णय देऊन मा. विद्युत निरिक्षक यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेऊन त्या अहवालानुसार कार्यवाही करावी असा आदेश दिला आहे. सदर आदेशाची कार्यवाही न झालेमुळे तसेच या आदेशामुळे त्यांचे समाधान न झालेमुळे त्यानी या मंचाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

महावितरणकडून पत्र क्र. ४७२ दि. ०९.०२.२०१५ अन्वये दाखल करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये महावितरणकडून नमुद करण्यात आले आहे की, दि.१७.१०.२०१४ रोजी कक्षाने दिलेल्या निर्णयानुसार हे प्रकरण मा. विद्युत निरिक्षक रत्नागिरी यांचेकडे त्यांच्या अभिप्रायासाठी दाखल करणेत आलेले आहे त्यांचेकडून अभिप्राय प्राप्त होताच त्यामधील आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल. याशिवाय महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ विनिमय ६.८ (३) अन्वये हे प्रकरण अपघात या सदरात येत असून सदर प्रकरण मंचाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही त्यामुळे हे प्रकरण निकालात काढणेत यावे अशी विनंती करणेत आलेली आहे.

दि.१०.०२.२०१५ रोजी घेणेत आलेल्या सुनावणीमध्ये ग्राहकाच्या वतीने श्री शशीकांत वैद्य तसेच महावितरणकडून श्री गायकवाड (अतिरिक्त कार्यकारी अभियंता खेड) यांनी भाग घेतला.

तक्रारदाराच्या वतीने बाजू मांडताना श्री वैद्य यानी नमुद केले की तक्रारदाराच्या जमीनीमध्ये असलेल्या रोहीत्रामुळे दि. ३०.०३.२०१४ रोजी स्पार्किंग झालेमुळे त्यांच्या शेतामधील झाडांचे नुकसान झालेले आहे. स्पार्किंग झाले त्या दिवशी श्री कोळेकर यांची प्रकृ ती ठीक नसल्यामुळे त्यानी याबाबतची तक्रार दि.०४.०४.२०१४ रोजी महावितरणच्या अधिकाऱ्याना दिली तसेच या नुकसानीचा तहसिलदार दापोली यांचेकडून पंचनामा करुन घेऊन त्याची प्रत महावितरणकडे दाखल केली पण महावितरणकडून याबाबतीत कोणतीही कार्यवाही न झालेमुळे त्यानी कक्षाकडे तक्रार दाखल केली. कक्षाच्या निर्णयावर देखील कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे त्याना मंचाकडे तक्रार दाखल करावी लागलेली आहे. हया स्पार्किंगच्या घटनेची कल्पना त्यानी फोनव्दारे विद्युत निरिक्षक रत्नागिरी याना दिलेली आहे तथापी लेखी पत्रव्यवहार केलेला नाही हया सर्व झाडांचे नुकसान झालेमुळे रु.५०००००/- (रु. पाच लाख) इतके नुकसान झालेले आहे नुकसानीची भरपाई करुन देण्याबाबत योग्य तो आदेश देण्याबाबत त्यानी मंचाकडे विनंती केलेली असून विद्युत रोहित्रामुळे स्पार्किंग होऊन लागलेली आगीची घटना अपघात या सदरात न येता आपत्ती या सदरात येते त्यामुळे ही बाब मंचाच्या कार्यक्षेत्रात येते व मंचाला याबाबतीत आदेश देण्याबाबत अधिकार आहेत असे मंचाच्या निदर्शनास आणून दिले.

महावितरणकडून आपली बाजू मांडताना श्री गायकवाड यानी नमुद केले की आग लागण्याची घटना दि. ३०.०३.२०१४ रोजी झालेली होती पण तक्रारदारानी हया घटनेची कल्पना महावितरणला दि. ०४.०४.२०१४ रोजी दिलेली आहे वास्तविक अशा घटनेची माहिती संबंधीता कडून २४ तासाच्या आत महावितरणकडून सादर करणे गरजेचे आहे. त्यानंतर शाखा अभियंता यानी प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केली व ही आग कोणत्याही विद्युत यंत्रणेमुळे लागलेली नसल्याचे त्याना आढळून आले, त्यामुळे नुकसान भरपाईबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

कक्षाने दिलेल्या निर्णयानुसार हे प्रकरण दि.०३.०२.२०१५ रोजी विद्युत निरिक्षण रत्नागिरी यांचेकडे अहवालासाठी सादर करण्यात आलेले असून त्यांच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल तथापी भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १६१ अन्वये ही घटना अपघात असून महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ विनिमय क्र. ६.८ (३) अन्वये अशा प्रकारच्या घटना व त्याअनुषंगाने सादर झालेली प्रकरणे मंचाच्या कक्षेत येत नाहीत त्यामुळे मंचाने हे प्रकरणे निकाली काढावे अशी विनंती केली.

सदर प्रकरणामध्ये उभय पक्षाकडून सादर करणेत आलेली कागदपत्रे व सुनावणी दरम्यान करण्यात आलेला युक्तीवाद याचा अभ्यास करता मंचाकडून निष्कर्ष नोंदविणेत येत आहे की, सदर बागेमधील झाडाना लागलेली आग ही जर वीज संचाच्या स्पार्किंगमुळे लागलेली असेल तर त्याबाबतीमध्ये निरिक्षण नोंद करणेबाबत संबंधीत तलाठी याना अधिकार नसून हयाबाबतचा निर्णय विद्युत निरिक्षक यानी क रणे अपेक्षित आहे. कक्षानी दिलेल्या निर्णयानुसार महावितरणकडून दि.०३.०२.२०१५ रोजी हे प्रकरण अहवाल प्राप्त करुन घेणेसाठी विद्युत निरिक्षक रत्नागिरी यांचेकडे दाखल करणेत आलेले आहे.

भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १६१ अन्वये ही घटना अपघात या सदरात येत असून महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ विनिमय ६.८ (३) नुसार अशा प्रकारची प्रकरणे मंचाच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत त्यामुळे प्रस्तुत प्रकरण निकाली काढणेत येत आहे. तथापी महावितरणने या प्रकरणामध्ये या अगोदरच विद्युत निरिक्षक रत्नागिरी यांचेकडे पत्रव्यवहार केलेला असून त्यांच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

# आदेश

**१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे .**

**२) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.**

**पत्ता :- सचिव,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,**
**६०६/६०८, केशवा,**
**बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.**
**फोन नं. ०२२- २६५९२९६५**

**श्री .व.बा.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १९.०३.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**

मी खाली सही करणार श्री ज. पु. बिवलकर या मंचाचा सदस्य या नात्याने मंचाकडून वर दिलेल्या निष्कर्षाशी मी सहमत नाही. त्याची कारणे खालीलप्रमाणे

१) (क) तक्रारदाराच्या बागेतील झाडाना लागलेली आग स्पार्किंमुळे लागली असेल तर त्या बाबतीत निरीक्षण नोंद करणेबाबत तलाठी याना अधिकार नसून याविषयीचा निर्णय विद्युत निरीक्षक यानी करणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे. मात्र तलाठी यांस अधिकार नाही असे म्हणताना कोणत्याही अधिनियमामधील तरतुदीचा उल्लेख केलेला नाही उलट महावितरणच्या दि.३१.१२.२००९ च्या परिपत्रक DIR (oprs) Im/ loss/Gen ३९९७३ क्र. मध्ये मुद्दा २(ii) मध्ये महसूल खात्यातील प्राधिकारी यांनी पंचनामा करणेबाबत उल्लेख आहे.

(ख) तसेच विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १६१ चे वाचन केल्यावरही एखादया व्यक्तीच्या फ्लँटमध्ये अपघात झाल्यास व अशा अपघातामुळे मनुष्य वा प्राणी यांची जीवित हानी झाली वा होण्याची शक्यता असली अथवा इजा झाली असली तरच कलम १६१ अशा अपघात प्रकरणी लागू

होते असे दिसते अपघाताची सूचना /अहवाल देण्यासाठी असलेला विहीत नमुना पहाताही ही बाब स्पष्ट होते. प्रस्तुत प्रकरणी घडलेली दुर्घटना या तरतुदीप्रमाणे अपघात नाही अर्थात् सीजीआरएफ व विद्युत लोकपाल याविषयींच्या आयोगाच्या विनियमातील तरतूद कलम ६.८ (३) दुरान्वयानेही लागू होत नाही. आणि म्हणूनच सदर तक्रार मंचाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही हा निष्कर्ष चुकीचा आहे.

२)(क) महावितरणने त्यांच्या प्रधान कार्यालयाच्या परिपत्रकाप्रमाणे कृती केली नाही असे आढळते. दुर्घटनेबद्दल प्राथमिक अहवाल, अन्वेषण अहवाल महावितरणने दाखल केला नाही. सुनावणीदरम्यान विचारणा केली असताही अहवाल उपलब्ध केला नाही. विद्युत निरीक्षकांचा स्थळपरीक्षणानंतर अन्वेषण अहवालही उपलब्ध नाही.

(ख) तक्रारदारानी दि.०४.०४.२०१४ रोजी सहाय्यक अभियंता, दापोली - २ उपविभाग यांस दुर्घटनेची लेखी सुचना देऊन पहाणी करण्याची विनंती केली असे दाखल कागदपत्रावरुन दिसते. तक्रारदारांनी दुर्घटनेचा पंचनामा तलाठी यांचेकडून करवून घेऊन, तहसिलदार यांनी तो उपविभागाकडे दि. ०३.०५.२०१४ रोजी पाठविला व त्यानंतर तक्रारदार यांनी दि.१२.०५.२०१४ च्या पत्राने स्मरणपत्र देऊन दि. ०४.०४.२०१४ चे पत्र विद्युत निरीक्षकांचे सूचनेनुसार दिल्याचे कळविले आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या दि.१७.१०.२०१४ च्या आदेशामध्येही विद्युतनिरीक्षकांकडून अहवाल प्राप्त करुन घेण्याविषयी स्पष्ट उल्लेख आहे. तरीही उपविभागीय अधिकाऱ्यांनी हे प्रकरण अत्यंत निष्काळजीपणे हाताळले असेच स्पष्ट होते.

(ग) तक्रारदार यांनी मंचाकडे दि.१८.१२.२०१४ रोजी तक्रार दाखल केल्यानंतर व त्याविषयीची प्राथमिक सुनावणी दि.२९.०१.२०१५ रोजी झाल्यानंतरच उपविभागाने विद्युत निरीक्षकाना सुमारे १ वर्षानंतर दि.०३.०२.२०१५ रोजी दुर्घटनेची माहिती दिली. महावितरणच्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही न करुन तक्रारदार यांस भरपाईपासून वंचित ठेवणे ही त्रुटीच आहे. यासाठीही मंच तक्रार विचारात घेऊ शकते. स्वतःच्या नाकर्तेपणाचा फायदा महावितरण घेऊ शकत नाही.

३) उस्मानाबाद येथील जिल्हा मंचासमोरील तक्रार क्र.५५/२००८ संबंधातील नजीर मुराद सय्यद विरुध्द सहाय्यक अभियंता एम्एस्ईडीसीएल् तुळजापूर व कार्यकारी अभियंता उस्मानाबाद या तक्रार प्रकरणी महावितरणने केलेल्या अपील क्र.६२०/२००८ मध्ये महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाने नियामाप्रमाणे कार्यवाही न करणे हीच त्रुटी आहे असे नमूद करुन महसूल खात्याने केलेले नुकसानाचे निर्धारण मान्य करुन अपील फेटाळले आहे.

४) प्रस्तुत प्रकरणी विलंबाने विद्युत निरीक्षकांकडे माहिती पाठविली असल्याने विद्युत निरीक्षकांनी त्यांचा अहवाल दिल्यास तो विचारात घेऊन याआधी परि १(क) मध्ये उल्लेख केलेल्या परिपत्रकाप्रमाणे पूर्तता करुन तक्रारदार यांस नुकसान भरपाई देणे न्याय संगत होईल.

५) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती व अधिनियमातील तरतुदी असल्या तरीही एक महत्तवाचा मुद्दा उपस्थित होतो तो म्हणजे तक्रारदारास मंचाकडे ही तक्रार करण्याचा अधिकार आहे काय? मंच व विद्युत लोकपाल यांच्या विषयीच्या आयोगाच्या २००६ च्या विनियमातील कलम २ (सी) लक्षात घेता प्रस्तुत तक्रार

'गाऱ्हाणे' आहे. मात्र विद्युत अधिनियम २००३ च्या कलम २(१५) प्रमाणे तक्रारदार ग्राहक नाहीत. तक्रारदारांची तक्रार जमीन मालक म्हणून करण्यात आलेली आहे. अर्थात् तक्रारदाराची तक्रार मंच विचारात घेऊ शकत नाही.

**श्री ज.पु.बिवलकर**
**सदस्य**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १९.०३.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**

## निर्णायक मत

महाराष्ट्र वीज नियामक आयोग अधिनियम २००६ अन्वये मला या मंचाचा सचिव व कार्यकारी अभियंता या नात्याने या प्रकरणा संदर्भात सुनावणी कालावधीत विशिष्ट हक्क व निर्णयाचा अधिकार असल्याने या नियमांचे अधिन राहून आदेशास अनुसरुन निर्णायक मत ( Casting Vote) स्पष्ट करु इच्छितो की, सदर प्रकरणातील विषय पहाता वीज वितरण व्यवस्थेच्या स्पार्किंग मुळे लागलेली आग हा अपघात असल्याचेच स्पष्ट आहे. भारतीय विद्युत कायदा २००३ कलम १६१ तसेच महाराष्ट्र वीज नियामक अधिनियम २००६ विनिमय ६.८ (३) अन्वये अशा प्रकरणामध्ये हस्तक्षेप करण्यात मंचाला अधिकार प्राप्त नसून हा विषय मंचाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेरचा आहे. या तरतुदी व निष्कर्षानुसार मंचाचा वरील आदेश कायम करण्यात येत असून हा आदेश उभय पक्षाना बंधनकारक राहील.

मंचाच्या सदस्यानी ज्या मुद्दयावर व ज्या कारणासाठी असहमती दर्शविली आहे ते सर्व मुद्दे प्रस्तुत प्रकरणात गौण ठरतात.

**श्री .व.बा.जगताप**
**सचिव / कार्यकारी अभियंता**
**ग्रातनिमं, कोकण परिमंडल**

**दिनांक :- १९.०३.२०१५**
**ठिकाण :- रत्नागिरी.**